
# माझा गद्धू

लेखक : जॉर्ज सिएन्ता

चित्रे: रॉबिन बेल्टन




# माझा गद्धू


लेखक : जॉर्ज सिएन्ता


चित्रे: रॉबिन बेल्टन






मी खूप खूप लहान असताना आमचं घर वरच्या मजल्यावर होतं. माझे सगळे मित्र आमच्या घरापासून खूप दूर रहात होते. माझ्याशी खेळायला जवळपास कोणीच नव्हतं. मग काय करणार, मी एकटाच खेळायचो. मग मी एकट्याने खेळायचे वेगवेगळे खेळ शोधून काढले. कधी जिन्याच्या सगळ्यात वरच्या, जास्तीत जास्त उंच पायरी वरून खाली उड्या मारायच्या, तर कधी माशा मारत बसायचं आणि एका तासात जास्तीत जास्त किती माशा मारल्या ते मोजायचं --- (हा...हा... हा...) आणि याचा कंटाळा आला की वेगवेगळे कपडे घालून निरनिराळ्या लोकांच्या नकला करायच्या.





एकदा काय झालं....उन्हाळ्याची सुट्टी होती, आणि हे असं एकट्या एकट्याने खेळून मला खूप कंटाळा आला होता. आता असले कुठलेच खेळ नव्हते खेळायचे मला. मी आमच्या घराच्या बाल्कनीत उभा राहून खालच्या रस्त्याकडे बघत बसलो होतो. त्या रस्त्यावर बाजार भरत असे.  तो रस्ता माणसांनी नुसता गजबजून गेला होता. माणसांची हीsss गर्दी. कोणी काही खरेदी करतंय तर कोणी काही विकण्यासाठी आरडाओरड करतंय,  किती वेगवेगळ्या वस्तू होत्या आणि त्यांच्या खरेदी-विक्रीसाठी हीsss झुंबड. बाल्कनीत उभा राहून ही गंमत बघण्यात वेळ कसा निघून गेला कळलंच नाही. त्याहून मोठ्ठी गंमत म्हणजे फळं,  भाज्या विकायला ज्या गाड्यांवर ठेवली होती त्या गाड्यांना गाढवं जुंपली होती. ते बघून मला गंमतच वाटली.





ती गाढवं बघण्यात, त्यांचं निरीक्षण करण्यात वेळ कसा गेला कळलंच नाही. मला वाटलं, आपल्याकडेही असं एखादं गाढव असतं तर.....पाहिजेच मला असं एक गाढव. आता माझा वाढदिवसही जवळ आला होता. पुढच्या आठवड्यातच की---





मी आईला म्हटलं, " आई गं, तुला माहितीय मला या वाढदिवसाला काय हवंय--? मला ना एक छानसं गाढव हवंय"
"---आई माझ्याकडे बघतंच राहिली---तिच्या तोंडून शब्द फुटेना---थोड्या वेळाने ती एकदम कडक आवाजात म्हणाली, " मूर्ख कुठचा !! गाढव बिढव काही मिळणार नाही। वेडाबिद्रा आहेस का काय तू?"


याला काय अर्थ आहे? का नाही मिळणार गाढव मला--? काय वाईट आहे त्यात? आणि वेडेपणा कसला त्यात?----मी आईला तसं विचारलंही, तर ती म्हणाली, " आपल्याकडे गाढव घेता येईल एव्हढे पैसे नाहीयेत ". मी म्हटलं, " मी माझ्याकडचे सगळे पैसे देईन, आणखीन साठवीन, हवं तर त्यासाठी जास्त कामंही करीन", तर त्यावर ती म्हणाली," अरे, आपल्या रोजच्या खर्चात, खाण्यापिण्यात खूप काटछाट करावी लागेल त्यासाठी, मग घरात सगळ्यांना पोटभर खायला मिळणार नाही.--".

"अं--- बरं, मग मी माझं जेवणखाण कमी करीन, बाकीच्यांच्याबरोबर वाटून घेईन---"

तर त्यावरही तिचं म्हणणं होतं की गाढव ठेवायला आपल्याकडे पुरेशी जागा नाहीय--- हां त्यात काय , त्याला मी माझ्या खोलीत ठेवीन की----

त्यावर मात्र ती काहीच बोलली नाही --- मला वाटलं, मी जिंकलो, हुश्श --- पण नाही, तसं नव्हतं --- कारण थोड्याच वेळात ती खूप जोराने ओरडून म्हणाली, " हे जे काय तुझ्या डोक्यात गाढव घेण्याचं खूळ भरलंय ना, तो निव्वळ मूर्खपणा आहे.--- आपण तिसऱ्या मजल्यावर रहातोय, लक्षात आहे ना? ---गाढवाला जिने चढता येत नाहीत".

ओ ---- हे काय आता नवीनच? छे बुवा --- मला हे माहीतंच नव्हतं की गाढवाला जिने चढता येत नाहीत ते ---- म्हणजे जोपर्यंत आम्ही वरच्या मजल्यावर रहात होतो तोपर्यंत मला गाढव मिळू शकणार नव्हतं.---





त्यानंतर एके दिवशी  दुपारी, मी असाच बाल्कनीत उभा राहून खाली दिसणारा बाजार बघत होतो, आणि बघतो तर काय, मला एक गंमत दिसली --- एक छोटंसं गाढव रस्त्यावर एकटंच इकडेतिकडे भटकत होतं. त्याच्याकडे कुणाचंच लक्ष नव्हतं.  रस्त्याच्या कडेला टाकून दिलेल्या भाज्या, पाला खाण्यात ते अगदी गढून गेलं होतं.








मी धडाधड जिन्याच्या पायऱ्या उतरून खाली गेलो , जवळ जवळ उडत उडतच. रस्त्यावर पोचलो, मग हळूहळू चालत अगदी सावकाश त्या गाढवाजवळ गेलो. माझ्याकडे कुणाचंही लक्ष नव्हतं .

मी हळूच गाढवाच्या जवळ गेलो आणि त्याच्या डोक्यावर हळूच जरासं खाजवलं, त्याला थोपटलं, त्यानेही माझ्याकडे असं बघितलं की जणू काही मी त्याचा जुना मित्रच होतो--- बऱ्याच वर्षांनी भेटलेला ---


रस्त्याच्या बाजूच्या नाल्यात मला काही कोबीची पानं मिळाली --- ताजी ताजी होती, नुकतीच टाकलेली असावीत. मी त्यातली काही उचलली, आणि त्याच्या तोंडाजवळ धरली तर इतकी हावरटासारखी खाल्ली त्याने आणि माझ्या दिशेने जवळ जवळ येऊ लागलं, तसं तसं मी त्याला गर्दीपासून दूर दूर, आमच्या घराच्या जिन्याच्या दिशेने नेऊ लागलो.



मग मी हळूच त्याला कोबीच्या पानाच्या मदतीने, जिन्याकडे वळवलं --- मला वाटलं, याला जिना चढायला शिकवता आलं असतं तर किती छान झालं असतं---

आता मी त्याच्या मागे जाऊन त्याला थोडा धक्का मारायचं ठरवलं आणि त्याच्या मागे जाऊन माझे हात त्याच्या पाठीवर शेपटाजवळ ठेवले आणि धक्का मारणार एव्हढ्यात-----काय आश्चर्य---त्याने त्याचे मागचे दोन्ही पाय झाडले आणि वेगाने उड्या मारत जिना चढायला लागलं.--- मी त्याच्या मागे धावत धावत धापा टाकत गेलो --- माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासंच बसेना--







मी त्याच्यामागे धावत धावत जिना चढून गेलो आणि त्याच्या शेपटीला धरून माझा एक पाय जिन्याच्या कठड्याला लावला आधारासाठी आणि कसंबसं त्याला थांबवलं. मग त्याच्या डोक्यावरच्या छोट्या छोट्या केसांना धरून त्याला हळूहळू आमच्या घराच्या दारासमोर आणलं.

एका हाताने घराची किल्ली काढली आणि दार उघडलं. गाढव चक्क आत आलं माझ्या मागोमाग. मला इतका आनंद झाला म्हणून सांगू --- किती किती पाप्या घेतल्या मी माझ्या लाडक्या गदधूच्या ---- त्याच्या मऊ मऊ काळ्या नाकाच्याही --- त्याच्या गळ्याला मिठी मारून मी त्याला माझ्या खोलीत घेऊन गेलो.









त्या दिवशी दुपारी आई काही सामान आणायला बाहेर गेली होती. जेव्हा मी दाराला चावी लावायचा आवाज ऐकला, तेव्हा मी धावत धावत आईकडे गेलो.

" आई,--आई---आई---आई ऐक ना, आई माझ्याकडे एक गंमत आहे तुझ्यासाठी--"

तिने एका हाताने मला वाटेतून बाजूला सारलं आणि हातातल्या सामानाच्या जड जड पिशव्या खाली टाकल्या आणि दमून खाली बसली. त्या दिवशी जरा जास्तंच उकडत होतं आणि आई अगदी थकून गेली होती.

" चल पळ, बाहेर जा आणि खेळ बघू ---" ती म्हणाली--- "आणि दिसत नाहीय का तुला मी दमलेय ते?--" ती जराशी चिडून म्हणाली.

"अगं पण आई ऐक ना, माझ्याकडे एक खूप म्हणजे खूप मोठ्ठी गंमत आहे तुझ्यासाठी, तू डोळे बंद कर ना आणि मी सांगेपर्यंत उघडू नकोस --- चल ना गं आई, असं काय करतेस,प्लीज--"

बिच्चारी आई, शेवटी तिने एक सुस्कारा टाकून माझ्या म्हणण्याप्रमाणे डोळे बंद केलेच.

मग मी आईला घेऊन माझ्या खोलीत गेलो, माझ्या गद्धूला पट्कन माझ्या मागे धरून आणलं आणि आईच्या समोर आणून उभं केलं. बराच वेळ दोघंही समोरासमोर जवळजवळ नाकाला नाक लावूनच उभे होते.

" हं, आता उघड डोळे" मी आईला म्हणालो.

आईने डोळे उघडले. काही सेकंद गद्धू आणि आई, दोघंही एकमेकांकडे डोळे मोठ्ठे करून बघत राहिले आणि मग अचानक आई मोठ्ठ्याने किंचाळली आणि गद्धूही जोरजोरात खिंकाळू लागला. दोघांचाही आवाज आता अगदी कानठळ्या बसवत होता.






" हा माझा गद्धू आहे--" आवाज थोडा कमी झाल्यावर मी आईला म्हणालो.

" आधी या घाणेरड्या प्राण्याला माझ्या घरातून बाहेर हाकल" --- आई जोरात ओरडली.

" पण आई, तो मला सापडलाय---" मी म्हटलं --- "आणि आई तुला माहीत नाही तो किती हुशार आहे ते --- माझी काही मदत न घेता एकटा जिना चढून आलाय तो ---".

" त्याची हुशारी मला सांगू नकोस --- त्याला आत्ताच्या आत्ता आधी बाहेर काढ---" आईने फर्मान सोडलं.










मग तिने एक जुना दोर शोधून काढला, तो गद्धूच्या गळ्यात टाकला, आणि हातात एक काठी घेऊन आम्हां दोघांना तिने घराबाहेर, अगदी जिन्यावरून खाली, हाकलून दिलं.

मी आणि गद्धू दोघंही रस्त्यावर आलो, तेव्हढ्यात एक म्हातारा माणूस धावत आला आणि माझ्या आईला म्हणाला, " अहो बाई, हे माझं गाढव आहे"

आई त्याला म्हणाली " हो का? मग नशीबवान आहात तुम्ही. हे तुमचं गाढव रस्त्यावर एकटंच इकडेतिकडे भटकत होतं, त्याला माझा मुलगा घेऊन आला आणि तुमच्या गाढवाला त्याने खाऊपिऊ घातलंय"

त्या माणसाने माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाला " तू यांचा मुलगा का ?" मी मान हलवून हो म्हटलं.

" हं, चांगला शहाणा मुलगा दिसतोस तू" तो म्हणाला, आणि त्याने खिशातून एक चांदीचं नाणं काढून माझ्या हातावर ठेवलं, आणि माझ्या गद्धूला तो घेऊन गेला.





त्या दिवसानंतर कितीतरी दिवस मी एकटाच रडत होतो. झाल्या घटनेबद्दल त्या नंतर आम्ही कधीच काही बोललो नाही, पण मला मात्र सगळी गाढवं त्या नंतरही अजूनही खूप खूप आवडतात . आजही जर का एखादं गाढव रस्त्यात दिसलंच तर मी त्याच्या डोक्यावर हळूच थोपटतो, गळ्याला मिठी मारतो, आणि तुम्हाला सांगतो--- जर का कोणीही बघत नसेल न तर --- तर हळूच त्याचा पापाही घेतो.

समाप्त

